# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172**

**No,CGRF/AZ/R / 216 / 2009 /50 /** **Date :-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer ,**
**O&M Rural Circle , M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

**Sub:- Forwarding of grievance in respect Smt. Asrabai Manikrao Erande, Tq.Paithan, 74 ,Jalgaon Post Dhakephad, Dist. Aurangabad. (Consumer no. 493500001221)**

**Dear Sir,**

**Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Forwarding of grievance in respect Smt. Asrabai Manikrao Erande, Tq.Paithan, 74 ,Jalgaon Post Dhakephad,Dist. Aurangabad.**

**The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of wrong assessment bill issued by Distribution Licensee.**

**You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 02.06.2009 at 12=45 Hrs.**

**Encl: As above**

**Member/Secretary**
**CGRF(AZ) MSEDCL**
**Aurangabad.**

**Copy to:-**
**Smt. Asrabai Manikrao Erande,**
**Tq.Paithan, 74 ,Jalgaon ,**
**Post Dhakephad,**
**Dist. Aurangabad.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/२१६/२००९/५०**

**तक्रार दाखल दिनांक :- २६/०५/२००९**
**निकाल दिनांक :- ३०/०६/२००९**

**सौ. आसराबाई माणिकराव एरंडे,**
**रा.७४ जळगांव पोस्ट ढाकेफळ,**
**ता.पैठण जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९३५००००१२२१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**ग्रामीण विभाग औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

# आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २६/०५/२००९ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०२/०६/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने महावितरण वीज कंपनीकडुन घरगुती वापरासाठी वीज पुरवठा घेतला असुन त्यांनी ऑक्टोबर २००८ पर्यंत वीज बिलाचा भरणा नियमीतपणे केला आहे. ऑक्टोबर ते नोव्हेंबर २००८ या काळात त्यांना मीटर वरील रिडींगची चुकीची नोंद घेवुन जास्त रक्कमेचे बिल आकारले. अर्जदार यांनी याबाबत महावितरणच्या संबंधित वीज विभागाकडे तक्रार दााखल केली पण त्याची कोणतीही दखल न घेता त्यांना सतत चुकीचे बिल देण्यात आले. अर्जदाराने या चुकीच्या वीज बिलापोटी त्यांचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत तसेच योग्य बिल आकारणी करण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक ०२/०६/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री माणिकराव एरंडे उपस्थित होते.महावितरण तर्फे नोडल अधिकारी म्हणुन कु.एस.बी चिवांडे उपस्थित होत्या.त्यांनी संबंधित विभागाकडुन या प्रकरणाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याची विनंती केली. मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करीत पुढील सुनावणीपर्यंत आपला जवाब दाखल करण्याची परवानगी दिली तसेच अर्जदाराच्या तक्रारीचे निवारण होईपर्यंत त्यांचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत अंतरिम आदेश पारीत केला व या प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक ०९/०६/२००९ रोजी घेण्याचे ठरविले.

३)	दिनांक ०९/०६/२००९ रोजी अर्जदार प्रतिनिधी तसेच नोडल अधिकारी यांचे अधिकृत प्रतिनिधी म्हणुन श्री चव्हाण सहाय्यक अभियंता पैठण उपविभाग उपस्थित होते. त्यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला व अर्जदारास चुकीचे वीज बिल देण्यात आल्याचे मान्य केले. मंचाने स्थळपाहणी अहवाल तसेच वीज बिल दुरुस्ती प्रस्ताव पुढील सुनावणीच्या वेळी दाखल करण्याचे नोडल अधिकारी यांना आदेश देवुन पुढील सुनावणी दिनांक १६/०६/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

४)	दिनांक १६/०६/२००९ रोजी अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी बिल दुरुस्ती प्रस्ताव मंचात दाखल केला व अर्जदारास ३९३०=६० रुपयाचे क्रेडीट देण्याची तयारी दर्शविली. नोडल अधिकारी यांनी स्थळपाहणी अहवाल मंचात दाखल न केल्यामुळे त्यांना तो दिनांक १९/०६/२००९ पर्यंत दाखल करण्याचे आदेश देत प्रकरण निकालासाठी ठेवले.

५)	अर्जदार व महावितरण वीज कंपनीतर्फे मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळुन येते की,सप्टेबर २००८ पर्यंत अर्जदारास मीटरवरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारणी करण्यात येत होती. ऑक्टोबर २००८ मध्ये त्यांना **INACCE** स्टेटस दाखवत ५१ युनीट वीज वापराचे बिल आकारण्यात आले. नोव्हेंबर २००८ मध्ये मागील रिडींग ८३१ युनीट व चालु रिडींग २३८१ अशी दर्शवित अर्जदारास १५४३ युनीट वीज वापराचे बिल देण्यात आले.महावितरण तर्फे नोव्हेबर २००८ मध्ये घेण्यात आलेली २३८१ रिडींग चुकीची असल्याची अर्जदाराची मुळ तक्रार आहे. महावितरण तर्फे करण्यात आलेल्या स्थळपाहणी अहवालात चुकीची रिडींग घेतल्यामुळे वीज बिल दुरुस्ती करुन अर्जदाराचे ३९३०=६०/- रुपयाचे क्रेडीट देण्याचा प्रस्ताव मंचात दाखल केलेला आहे. ज्यात व्याज व दंड याची रक्कमसुध्दा

कमी करण्यात आलेली दिसुन येते. महावितरण तर्फे दाखल करण्यात आलेला बिल दुरुस्ती प्रस्ताव मंच मान्य करीत असुन अर्जदारास त्याप्रमाणे वीज बिल आकारणी करण्याची मान्यता देण्यात येत आहे.
वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदारास ऑक्टोबर २००८ नंतर दिलेली सर्व वीज बिल रद्द करण्यात येत आहेत.

२) महावितरण कंपनीस बिल दुरुस्ती करुन ३९३०.६०/-रुपये रकमेचे क्रेडीट देवुन ३० दिवसांत अर्जदारास सुधारीत वीज बिल द्यावे.तसेच अर्जदाराचे मीटर बदलुन द्यावे.

३) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास चुकीचे वीज बिल आकारुन मानसीक त्रास दिल्याबद्दल ५००/-रुपये नुकसान भरपाई ३० दिवसात द्यावी.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.


**क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/२१६/२००९/५०** **दिनांक :-**

**प्रति,**

**सौ. आसराबाई माणिकराव एरंडे,**
**रा.७४ जळगांव पोस्ट ढाकेफळ,**
**ता.पैठण जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९३५०००१२२१)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/ग्रा/२१६/२००९/५० )

आपण दिनांक २६/०५/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**प्रती, सविनय सादर,**
**मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,**
**म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.**

**प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद**
**माहिती व उचीत कारवाही करीता**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**